# **महासचिवांचा वार्षिक अहवाल**

## **01 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025**

प्रिय वाचक मित्रहो, सण 2024- 25 चा वार्षिक अहवाल मी आपणासमोर अतिशय समाधानाने सादर करीत आहे. आज पर्यंतचा हा वाढता आलेख संस्थेची उंची गाठणारा तर आहेच परंतु सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने प्रेरणादायी असाच आहे. परमेश्वरा जवळ मागणी मागून त्याने तथास्तु म्हणणे आणि स्वप्नवत ते सर्व काही भरभरून मिळणे इथे होत नसते. तर प्रत्यक्षात मैदानात उतरून येथे कृती आराखडा तयार करावा लागतो, प्रचंड मेहनत, लोकांशी संपर्क, पाठपुरावा आणि लोकांशी असलेले हितसंबंध तसेच सामाजिक स्थितीचा आढावा संस्थेच्या कार्यासाठी महत्त्वपूर्ण असतो. थोडक्यात काय तर दृष्टीहीन बांधवांसाठी काम करतानाही त्यांच्या हक्कांसाठी, हितासाठी व सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहूनच उपक्रम राबवावे लागतात.

यावर्षीची सर्वोच्च उपलब्धी म्हणजे त्र्यंबक रोड येथील शाळेच्या इमारतीसाठी घेतलेली जागा. या जागेचे फलक अनावरण करताना झालेला आनंद खूपच सुखकर असा होता. तसेच ब्रेबॉर्न सारख्या स्टेडियम वर अंध खेळाडूंना नॅशनल क्रिकेट खेळवणे याशिवाय दोन अंध दांपत्याचा विवाह थाटामाटात लावून देणे असो. यासारखे उपक्रम आम्हा सर्वांना अद्वितीय आनंद देणारे असेच आहेत. अर्थात हे सामुहिक काम असून माझे सर्व सहाय्यक पदाधिकारी यांच्या सहकार्य शिवाय हे अशक्य आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपणासारखे संस्थेचे हितचिंतक व समाजातील दानशूर व्यक्ती त्यांच्या दातृत्वाशिवाय देखील संस्था उपक्रम राबवू शकत नाही.

1. **आळंदी येथे ज्ञानेश्वरी पारायण:** दृष्टीहीन बांधवांना अध्यात्माची गोडी लागावी व तत्कालीन मराठी भाषेत असलेलासाहित्याचाखजिना आपणास सहजपणे उमजावा या उद्देशाने गेल्या दोन वर्षापासून संस्थेच्या वतीने ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी देवाची आळंदी येथे 15 मे 2024 ते 17 मे 2024 या कालावधीत पवित्र ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण करण्यात आले. सबंध राज्यातून बालकांपासून वृद्धांपर्यंत 60 पेक्षा अधिक व्यक्ती या पारायणात सहभागी झाले आणि या पारायणात लक्ष वेधून घेतलंते भोसरी शाळेतील काही चिमुरड्या दृष्टीहीन विद्यार्थ्यांनी. अगदी सहजपणे पारायण करत ओव्यांचे वाचन ते करत होते. अनेकांनी त्यांना पाठीवर शाबासकीची थापही दिली. या पारायणाचे उद्घाटन आळंदी देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजन महाराज, संस्थेचे हितचिंतक सीनियर पोलीस इन्स्पेक्टर किरण कबाडे, आळंदी येथील डॉक्टर नारायण जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.



या तीन दिवस चाललेल्या पारायणात अध्याय क्रमांक 9, 12, 15, 16 व 18 या अध्यायांचं क्रमशः वाचन करण्यात आले.  दररोज सायंकाळी श्रवणीय कीर्तनाचा आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च देवस्थानच्या वतीने करण्यात आल्याने संस्थेस कोणताही फारसा आर्थिक भार पडला नाही. कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर, महासचिव  दत्ता पाटील  वरेचल शिरसाट यांनी विशेष परिश्रम घेतले.

२. **शिष्यवृत्ती वितरण सोहळा:** संस्थेच्या वतीने 22 जून  2024  रोजी शिष्यवृत्ती वितरण सोहळा पुणे येथील उद्यान मंगल कार्यालययेथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी 127 गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनींना प्रति व्यक्ती 1800/- रुपये याप्रमाणे शिष्यवृत्तीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. सदर शिष्यवृत्ती योजना शासनाचे कोणतेही अनुदान नसताना देखील सातत्याने 17 वर्षापासून सुरू असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी दिली. यावेळी मंचावर राज्यसभेच्या खासदार मेधाताई कुलकर्णी, उद्योजक कृष्णकुमार गोयल, शिक्षण प्रसारक दीपक शहा, स्वरूप सेवा समितीचे अध्यक्ष उमेश झिरपे, डॉक्टर सत्यशील नाईक व डॉक्टर शालिग्राम भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते.

याच  कार्यक्रमात कोहिनूर ग्रुपचे चेअरमन कृष्णकुमार गोयल यांनी संस्थेस दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना सन्मानपत्र, पुणेरी पगडी, शाल, श्रीफळ देऊन खासदार मेधाताई कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्था अखंडित शिष्यवृत्ती योजना 17 वर्ष राबवीत असल्याचे पाहून ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टर सत्यशील नाईक यांनी संस्थेला पुढील कार्याची बळकटी देण्यासाठी 51000/- रुपयांची देणगी दिली. तर सत्काराला उत्तर देताना कृष्णकुमार गोयल यांनी सांगितले की केवळ सत्कारासाठी नव्हे तर सामाजिक बांधिलकी म्हणून मी आजवर दिव्यांगांच्या या संस्थेला मदत करीत आहे आणि पुढेही करत  राहील. यावेळी बोलताना खासदार मेधाताई कुलकर्णी यांनी दृष्टिहीन विद्यार्थ्यांची टक्केवारी आणि प्रगती बघून आपण प्रभावित झाल्याचे सांगितले मात्र या यशाने भारावून न जाता यापुढे सातत्याने शिकत राहा आणि उच्च यश संपादित करा अशा शुभेच्छा त्यांनी विद्यार्थ्यांना दिल्या. तसेच संस्था दिव्यांगांसाठी नाशिक येथे करीत असलेल्या वास्तू निर्माणाच्या कार्यासाठी खासदार निधीतून भरीव मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

 

कार्यक्रमात कमला एज्युकेशन सोसायटीचेचेअरमन दीपक भाई शाह यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉक्टर शालिग्राम भंडारी संस्थेचे उपाध्यक्ष डॉक्टर विश्वासराव गायकवाड, संचालक भगवान पवार,महासचिव दत्ता पाटील, महावीर ओसवाल आदींनी परिश्रम घेतले.

3. **अंध दाम्पत्यांचा विवाह सोहळा संपन्न:**

नाशिक पुणे रस्त्यावरील श्रीकृष्ण लॉन्सवर नेहमीच विविध प्रकारचे विवाह सोहळे संपन्न होत असतात परंतु आज दुपारी द ब्लाइंड वेल्थ ऑर्गनायझेशन या नाशिकच्या संस्थेतर्फे अंध दाम्पत्याचा झालेला विवाह सोहळा अन्य कोणत्याही | विवाह सोहळ्यापेक्षा अनोखा म्हणावा लागेल.

समाजात दुर्दैवाने जन्मतः अथवा अन्य कोणत्याही कारणाने आलेल्या दृष्टीहीन तरुणांच्या समस्या खूप वेगळ्या असतात सर्वसामान्य माणसांच्या जीवनामध्ये घडणारी विवाह सारखी गोष्ट देखील या दृष्टीहीनांच्या आयुष्यामध्ये अवघड असते. सहसा कोणताही डोळस जोडीदार अंघ जोडीदाराबरोबर विवाह करण्यास सहसा तयार होत नाही. समाजातील अंध तरुणांना देखील जीवनातील विवाह सुख मिळावे या दृष्टीने समाजातील डोळस दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने दृष्टीहीन अंधांसाठी संस्थेतर्फे पूर्णतः दृष्टि बाधित असलेल्या अंघ तरुणांचा विवाह सोहळ्याचे आयोजनकरण्यात आले होते. मुंबईच्या वांगणी येथील तुळशीदास राठोड जळगाव येथील दिव्या लोहार तसेच नाशिक जिल्ह्यातील दुगाव येथील बाळू खंडू पोरजे सोलापूर येथील सोनाली ताकभाते या जोडत्यांचा विवाह सोहळा श्रीकृष्ण लॉनवर अन्य विवाह सोहळ्याप्रमाणेच अत्यंत थाटामाटा मध्ये संपन्न झाला.

सनई चौघडा स्टेजवरील सजावट स्वादिष्ट जेवण याचबरोबर आशीर्वाद आणि शुभेच्छा देण्यासाठी समाजातील उच्च पदस्थांची उपस्थिती या सोहळ्याचे वैशिष्ट्य होते सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असलेल्या नाशिक येथील लायन्स क्लब या संस्थेने देखील या विवाह सोहळ्यात महत्वपूर्ण हातभारलावला. त्याचप्रमाणे लायन्स क्लबचे पदाधिकारी व मराठा महिला मुद्रा मंडळाचे अनेक पदाधिकारी वधूवरांना शुभेच्छा आणि आशीर्वाद देण्यासाठी कामकाजाची वेळ असताना देखील आवर्जून उपस्थित राहिले.

मंगलाष्टकांच्या गजरात वैदिक विवाह झाल्यानंतर स्वरांचे अन्य धार्मिक विधी देखील या ठिकाणी झाले. तसेच संस्थेतर्फे आणि दानशूरांतर्फे नववधूला आवश्यक ते दाग दागिने आणि संसार उपयोगी साहित्य देखील यावेळी दिले.यावेळेस मंचावर नाशिकचे प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉक्टर राकेश कनोजिया नंदकुमार लाहोटी व अन्य मंडळी व्यासपीठावर उपस्थित होती.



त्यानंतर मागील शैक्षणिक वर्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या दृष्टी बाधित ४७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश आणि नवीन वर्षांत शिकणाऱ्या अंध व्यक्तींच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप यावेळी संस्थेतर्फे केले.

नाशिक शहरात व महाराष्ट्रात सुरू असलेल्या धुवाधार पावसामुळे काही दृष्टिहीन तरुण-तरुणी तसेच तातडीच्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या कामात व्यस्त झाल्याने नाशिकचे पोलीस आयुक्त कर्णिक या विवाह सोहळ्यास उपस्थित राहू शकले नाही त्यांनी आपल्या शुभ संदेशनवविवाहितांना पाठविले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ. विजया डबे मराठे, सौ. प्रतिभा होळकर, संस्थेच्या मानद अध्यक्षा सौ. कल्पना पांडे, लायन क्लब नाशिक स्टार च्या सौ. सारिका कलंत्री, लायन्स क्लब नाशिककॉर्पोरेट चे अध्यक्ष अजय सानप यांनी विशेष परिश्रम घेतले.

4. **पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी भक्ती संगीत मैफिल:** खरे तर संस्थेचा वर्धापन दिन हा 11 जुलै रोजी असतो परंतु कार्यक्रमाकरिता काहीतरी योग्य निमित्त असावे म्हणून संस्थेच्या वतीने आषाढी एकादशीचे औचित्य साधून 16 जुलै 2024 रोजी परशुराम सायखेडकर नाट्यगृहयेथे अंध कलावंतांनी निर्मित केलेला “पंढरीचे सुख नाही त्रिभुवणी” या “विठ्ठलमय भक्ति गीताच्या कार्यक्रमाचे आयोजन” करण्यात आले होते.

याच कार्यक्रमात अंध आणि डोळस कलावंतांनी एकत्रित येऊन अभंग सादर केले. खरे तर गायन म्हटले की जिथे अंधत्व कधीच आड येत नाही कारण अंध व्यक्ती हे उत्तम गाऊ शकतात. गायनाला न्याय देऊ शकतात परंतु त्यांना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे म्हणून संस्थेने वर्धापन दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.याच कार्यक्रमात संस्थेचे एक दायित्व म्हणून दुर्गा मसुरे या विद्यार्थिनीला इयत्ता बारावीची ब्रेल गाईड मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. ज्याची किंमत रु.3500/- आहे. तर कोंडाजी गांगुर्डे या अपघात ग्रस्त अंध व्यक्तीला व जालिंदर मोकळ यांना व्यवसायाकरिता मान्यवरांच्या हस्ते धनादेश देण्यात आले. यावेळी मंचावर कौशल्या हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर प्रमोद शिंदे, नाशिक विभागीय मंडळाचे सहसचिव डॉक्टर मच्छिंद्र कदम, परशुराम सायखेडकर वाचनालयाचे अध्यक्ष देवेंद्र जोशी व लायन्स क्लब ऑफ नाशिक सुप्रीमोचे शाम केदार व त्यांचे पदाधिकारी तसेच रोटरी क्लब ऑफ नाशिक स्मार्ट सिटी यांचे पदाधिकारी देखील उपस्थित होते.






आरंभी राम कृष्ण हरीच्या गजराने भक्ती मैफिलीची सुरुवात करण्यात आली व सुश्राव्य अभंगाणचे गायन सादर केले. अर्जुन शिंदे, दत्तू माने व सुप्रसिद्ध गायिका विध्या ओक यांनी  एकापेक्षा एक अधिक अशी अभंग प्रत्येक कलावंताने सादर केली. कार्यक्रमाचे निवेदन संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी केले तर कार्यक्रमाचे व्यवस्थापन कोषाध्यक्ष विजया दबे मराठे, मानद अध्यक्ष डॉ. विजय घाडगे, संचालक भगवान पवार यांनी केले. साथसंगत तबला राजेश भालेराव, व्हायोलिन भगवान पवार सिंथेसाईजर जय भालेराव, मृदुंग किरण लहामगे, तालवाद्य व ऑटोपॅड सुशील केदारे यांनी साथ केली.

5. **गुणगौरव सोहळा संपन्न:**सन2024- 25 या शैक्षणिक वर्षात उत्तम गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप पडावी म्हणून संस्थेच्या वतीने मागील 16 वर्षापासून अंध विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात येतो. पूर्वी हा गुणगौरव सोहळा एकाच ठिकाणी साजरा करण्यात येत असायचा मात्र विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्याने ज्या विद्यार्थ्यांना अडचणीचे होऊ नये म्हणून संस्थेने यावर्षी नाशिक, मुंबईव पुणे या ठिकाणी वेगवेगळ्या दिवशी स्थानिक स्तरावर या कार्यक्रमांचे आयोजन केले. जेणेकरून विद्यार्थ्यांची गैरसोय तर होणार नाही परंतु सत्कारापासून कोणी वंचितही राहणार नाही या दृष्टीने हे कार्यक्रम स्थानिक स्तरावर आयोजित करण्यात आले होते.

24 ऑगस्ट 2024 रोजी 2024– 25 या शैक्षणिक वर्षात उत्तम गुण संपादन केलेल्या 72 विद्यार्थ्यांचा सत्कार श्रीकृष्ण लॉन्स, पुणे रोड येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मंचावर रोटरी क्लब नॉर्थ चे पदाधिकारी व मानवता उत्थान चे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरंभी दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले व त्यानंतर सत्कार सोहळ्याला प्रारंभ झाला. यावेळी प्रत्येक गटामध्ये प्रथम तीन विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. ज्यामध्ये दहावीत वरदान आष्टीकर ला 95% गुण, तिरुपती गायकवाडला इयत्ता बारावी कॉमर्स विभागात 77% तर रोहिणी नागरे हिला पदवी मधे अर्थशास्त्र विषयात 81% मार्क बघून सर्व पदाधिकाऱ्यांचे नजरा त्यांच्याकडे गेल्या. शिवाय अंध असताना देखील एवढी भरारी मारली याचा सत्कारार्थीना अभिमान तर होताच परंतु आपण अंध असलो तरी कुठेही कमी नाही असे उत्तर वरदान अष्टीकर यांनी मान्यवरांना दिले. या कार्यक्रमाला रोटरी क्लब नाशिक नॉर्थ चे अध्यक्ष गिता पिंगळे, सचिव अगस्त्य मुनीम इनरव्हीलच्या माधुरी महाजन, मानवता उत्थान मंडळाच्या अध्यक्षा भारती जाधव, जगबीर सिंग व कुलदीप कौर हे उपस्थित होते.

असाच कार्यक्रम मुंबई येथे देखील 1 सप्टेंबर 2024 रोजी बहाय सेंटर येथे रोटरी क्लब बॉम्बे क्वीन सिटी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता.ज्यामध्ये 79 विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.





द ब्लाइंड वेलफेअर ओर्गनाईजेशनवरोटरी क्लब ऑफ पिंपरी चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनाचे औचित्य साधून गुरुवार दिनांक 5 सप्टेंबर 2024 रोजी, स्वामी कृपा हॉल, कर्वे रोड कोथरूड पुणे येथे पुणे विभागातील 125 दृष्टिहीन विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी मंचावर आळंदी देवस्थानचे माजी विश्वस्त श्री योगेश देसाई, रोटरी क्लब आकुर्डी चे अध्यक्ष गौतम शहा, रोटरी क्लब ऑफ तळेगाव दाभाडे चे अध्यक्ष श्री कमलेश कार्ले, रोटरी क्लब ऑफ चिंचवडचे अध्यक्ष पराग जोशी, लायन्स क्लब ऑफ गणेश खिंडचे अध्यक्ष शैलेश खंडेलवाल उपस्थित होते. याच कार्यक्रमात शिक्षक दिनाच्या निमित्ताने श्री. पांडुरंग साळुंखे, सौ. संजीवनी वाघ, श्री. प्रशांत शिंदे, श्री. दत्ता राऊत, श्री. रंगनाथ गजरे या शिक्षकांचा ज्ञानदान केल्याबद्दल आदर्श शिक्षक म्हणून सत्कार करण्यात आला. तर इयत्ता दहावी मध्ये जिन्नत शेख 80.60%,

अजिंक्य डोके 85.20%, शुभम राठोड 74.80% इयत्ता बारावी मध्ये ऋषिकेश वाघमारे 91%, शुभम नरवडे 88.67%, आवटे धम्मपाल 83.83% तर पदवी उत्तीर्ण मध्ये बोंबले सावित्री पुनम जाधव व अनिल पवार तर एम ए उत्तीर्ण मध्ये माधव मोरे 73% यांनी उत्तम गुण संपादन केल्याबद्दल त्यांचा प्रतिनिधिक स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सत्कार स्वरूपात विद्यार्थ्यांना ज्ञानवर्धक पुस्तक पांढरी काठी, पेन ड्राईव्ह, रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. वरील तिन्ही कार्यक्रमाकरिता संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर, डायरेक्टर भगवान पवार, संचालिका मेघा पिंपळे व महासचिव दत्ता पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

6. **<u>अंध विद्यार्थ्यांना लवकरच इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेता येणार, अध्यक्ष अरुण भारस्कर यांचे प्रतिपादन:</u>**

द ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन या संस्थेच्या वतीने नाशिक त्रंबक रोड परिसरात अंजनेरी शिवारातील गट क्रमांक 100 मध्ये जागा खरेदी करण्यात आली असून या जागेचे फलक अनावरण व वृक्षारोपणाचा कार्यक्रम दिनांक 9 सप्टेंबर 2024 रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी पंचवटी पोलीस स्टेशनचे पोलीस इन्स्पेक्टर मधुकरजी कड, उद्योजक दीपक चांदे, संस्थेचे

पदाधिकारी व नाशिक मधील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींच्या समवेत फलक अनावरण व वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी श्री कड यांनी वृक्षारोपण करून संस्थेचा हा एक वटवृक्ष व्हावा अशी अपेक्षा केली. तर दीपक चांदे यांनी देखील संस्थेने होऊ घातलेल्या उपक्रमाला सुरुवात म्हणून फलक अनावरण करताना पाच लाख रुपयांची देणगी देऊ केली व संस्थेच्या स्वप्नांची लवकरच पूर्तता हो अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी या जागेत एक अद्यायावत इंग्रजी माध्यमाची शाळा व एक कार्यशाळा सुरू करण्याचा मानस व्यक्त केला व ही जागा घेताना किती अडचणी आले असतील व बांधकामाच्या वेळेस देखील संस्थेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार असून या उपक्रमाकरिता समाजातील दानशूर मंडळींनी पुढाकार घेऊन मदत करावी असे आवाहन केले.



आरंभी मानद अध्यक्ष डॉ.विजय घाडगे यांनी प्रास्ताविक केले. तर संचालक राज व्यास यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या फलक अनावरण व वृक्षरोपण कार्यक्रमात महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी चे माजी ऑपरेशन हेड मा. हिरामन आहेर, संस्थेच्या मानद अध्यक्षा कल्पना पांडे, जैन सोशल ग्रुपचे श्री. सचिन शहा, पी आय बर्डीकर व लायन्स क्लब कॉर्पोरेटचे बहुसंख्य सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळेस लायन्स क्लब कॉर्पोरेट नाशिकच्या वतीने एक रूमच्या बांधकामाचा खर्च देण्याचे श्री अजय सानप यांनी जाहीर केले. तर आर्किटेक मनीष जाधव यांनी या उपक्रमाचे काम निशुल्क करण्याचे ग्वाही दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे संचालक डॉ. राकेश कनोजिया यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता उपाध्यक्ष डॉक्टर विश्वासराव गायकवाड, संस्थेच्या कोषाध्यक्ष विजया दबे मराठे, संचालक दिनेश मुसळे व भगवान पवार, योगेश कुलकर्णी, बाळासाहेब मटाले यांनी विशेष परिश्रम घेतले.

7. **जागतिक पांढरी काठी दिनाचे आयोजन:** खरे तर 15 ऑक्टोबर हा दिवस युनोने निश्चित केल्यानुसार सबंध जगभर जागतिक पांढरी काठी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी अंधांबाबत,अंधांच्या क्षमतांबाबत जनजागृती करण्यात येते अनेक संस्था विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात मग त्याला आपली ब्लाइंड वेलफेअर ऑर्गनायझेशन संस्था कशी अपवाद असणार. म्हणूनच द ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन व रोटरी क्लब ग्रेप सिटी आणि लायन्स क्लब सुप्रीमो यांच्या संयुक्त विद्यमाने 15 ऑक्टोबर 2024 रोजी जागतिक पांढरी काठी दिनाचे औचित्य साधून लायन्स क्लब हॉल, पंडित कॉलनी नाशिक येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

अंध व्यक्तींमध्ये त्यांच्यासुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून संस्थेच्या वतीने गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तसेच या कार्यक्रमात ज्या व्यक्ती रेल्वेत अथवा फेरी बस स्टॅन्ड सारख्या ठिकाणी व्यवसाय करतात अशाज्यामध्ये श्री मनोहर गाडेकर, फयाज शेख, जनार्दन इंगळे,

चंद्रकांत साळवे, दादा पानपाटील व महेंद्र मुसळे या दृष्टीहीन व्यक्तींना स्वयंरोजगाराकरता धनादेशाचे वितरण देखील करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी राईट टाईटफास्टनर चे श्री. संजीवन दरवले उपस्थित होते.



तर गीत गायन स्पर्धेत रमेश कुचेकर याने पहिला क्रमांक मिळविला तर कांतीलाल क्षीरसागर दुसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरले, विकास चव्हाण याला तृतीय क्रमांकावर समाधानी राहावे लागले व याच कार्यक्रमात 128 दृष्टीहीन व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता महासचिव दत्ता पाटील, कोषाध्यक्ष विजय डबे (मराठे), संचालक राजू व्यास, कु. रेचल शिरसाठ यांनी विशेष परिश्रम घेतले.

8. **दिवाळी मिलन कार्यक्रम:**सणांचा सण हा दिवाळी आणि म्हणून म्हणतात “दिवाळी सण मोठा नाही आनंदा तोटा”. दिवाळी म्हटलं की गरिबापासून तर अगदी श्रीमंतापर्यंत या सणाचे वेध कित्येक दिवस अगोदरच घरोघरी लागलेले असते. परंतु संस्थेच्या वतीने ज्या गरीब कुटुंबात दिवाळी सण साजरा होत नाही त्यांच्याकरता अनेक वर्षापासून दिवाळी मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

यावर्षी धनत्रयोदशीचे औचित्य साधून 29 ऑक्टोबर 2024 रोजी रुंग्ठा हायस्कूल येथे दिवाळी मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अनुभूती फाउंडेशनचे अध्यक्ष प्रविण पारेख, नाशिक मधील उद्योगपती नेमिचंद पोद्दार व लायन्स क्लब कॉर्पोरेट चे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निमित्ताने संस्थेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यात अंध व्यक्तींची वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून ब्रेल लिपीत दिवाळी अंक प्रसिद्ध करण्यात आला. याकरिता या अंकाचे ऑनलाइन प्रकाशन नगरचे उद्योजक व संस्थेचे हितचिंतक माननीय नरेंद्र भाऊ फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेच्या वतीने अंध व्यक्तींची दिवाळी गोड व्हावी म्हणून पुरुषांना कपडे, महिलांना साडी, मिठाई देण्यात आली. साधारण 138 व्यक्तींनी या उपक्रमाचा लाभ घेतला. तरश्री. भरीत व राजू कोठुळे या दोन व्यक्तींचे कायमचे पुनर्वसन व्हावे म्हणून त्यांना सहा× सहा चे स्टॉल व्यवसाय करता देण्यात आले. त्यातील एक स्टॉल हा लायन्स क्लब कॉर्पोरेट यांच्या वतीने देण्यात आला तर दुसऱ्या स्टॉल करिता उद्योजकविनय बिरारी यांचे सहकार्य मिळाले.

 

यावेळेस उद्योजक प्रविण भाई यांनी संस्था राबवत असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले व गेल्या पाच वर्षापासून आपण या उपक्रमाचे साक्षीदार असल्याचे अभिमानाने सांगितले. संस्थेने असेच उपक्रम राबवावेत व संस्थेने घेतलेल्या नाशिक त्र्यंबक रोड जागेत आपण एक आर्टिफिशल ऑफिस देखील देऊ असे आश्वासन दिले. तर नेमिचंद पोतदार यांनी आपण अंध झालात पण इतरांची दृष्टी वाचवावी ज्याकरता संस्थेने पुढाकार घ्यावायासाठी निर्माण ग्रुप आपल्या सदैव पाठीशी राहील याची ग्वाही दिली.तर श्री अजय सानप यांनी ज्या अंध व्यक्तींचे कायमस्वरूपी पुनर्वसन होणार आहे त्यांनी योग्य तो चांगला व्यवसाय करावा. जेणेकरूनव्यवसायास यश मिळेल हेलक्षात आल्यावर आम्ही यापुढे देखील भरीव मदत करू असे जाहीर केले. कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता कोषाध्यक्षा विजया डबे मराठे, संचालक अर्जुन मुद्दा, मानद अध्यक्षा कल्पना पांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

9. **अंध व्यक्तींना ऊर्जा प्राप्त व्हावी या उद्देशाने सहलीचे आयोजन:** दि ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन या संस्थेच्या वतीने अंध व्यक्तींना ताण-तणावातून सुटका मिळावी या उद्देशाने दरवर्षी सहलीचे आयोजन करण्यात येते. कारण सध्याचे जीवन म्हटलं की अतिशय गतिमान आणि धकाधकीचे जीवन झाले आहे. यात कोणी नोकरी करतो, कोणी व्यवसाय करतो त्यात त्यांना प्रचंड प्रमाणात ताण-तणाव निर्माण होतात आणि हे ताण-तणाव कमी व्हावे जेणेकरून काम करण्याकरिता एक नवीन ऊर्जा प्राप्त व्हावी हा या मागचा उद्देश असतो. म्हणून संस्थेच्या वतीने मागील 14 वर्षापासून अखंडितपणे सहलीचे आयोजन करण्यात येते. यानिमित्ताने विविध धार्मिक स्थळे व काही प्रेक्षणीय स्थळांचा समावेश असतो.

 

अंध व्यक्ती हा अंध असल्यामुळे अनेकदा त्याला घरची मंडळी विचारतात की तू तीर्थक्षेत्र स्थळी जाऊन तिथे काय बघणार? तुला काय दिसणार? त्यामुळे त्याच्यात एक न्युनगंड तयार होतो आणि पर्यायाने त्याच्यात काम करण्याची क्षमता ही कमी होते. म्हणून हाच तान तणाव कमी करावा या उद्देशाने संस्थेच्या वतीने यावर्षी दिनांक 20 ते 25 डिसेंबर2024 या कालावधीत सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीचे प्रस्थान कैलास मठातून झाले तेथून ही सहल अक्कलकोट

व अक्कलकोट हून पंढरपूर येथून नरसोबाची वाडी व कोल्हापूर नंतर रायगडावर पायी जाण्याचा आनंद त्यांनी घेतला वपरतताना त्यांनी रोप वे चा देखील आनंद घेतला हा आनंद त्यांच्या करता अविस्मरणीय होता. एकंदरीतच अतिशय अल्पदारात अंध व्यक्तींना संस्थेच्या माध्यमातून या सहलीचा आनंद घेता आला.

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी प्रशांत खालीपे - पंढरपूर, व रोटरी क्लब महाड चे अध्यक्ष अरुण गावडे व अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले.

१०. **राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन:** खरे तर अंध व्यक्तींमध्ये वेगवेगळ्या क्षमता असतात आणि त्या त्याला सिद्ध करता याव्यात म्हणून त्यांना एक हक्काचं व्यासपीठ निर्माण करून देण्याकरिता संस्था वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करते. त्याचाच एक भाग म्हणून अंध व्यक्तींची खेळाडू वृत्ती जोपासावी व त्यांना एक नवीन ऊर्जा प्राप्त व्हावी म्हणून संस्थेच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. जेणेकरून स्पर्धेमध्ये त्यांना स्वतःची चमकदार खेळी करून त्यांची खेळाडूवृत्ती सिद्ध करता यावी हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे.

यावर्षी संस्थेच्या वतीने दिनांक 30 व 31 डिसेंबर 2024 रोजी ठाणे येथील सिंघानिया मैदानावर या स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सबंध महाराष्ट्रातून नांदेड, अमरावती, चंद्रपूर, अकोला, पुणे, कोकण, नाशिक असे आठ संघ सहभागी झाले होते. ही स्पर्धा बाद फेरीने खेळण्यात आली असून अंतिम फेरीचा सामना चंद्रपूर व मारठवाडा या संघात झाला. मात्र हा सामना चंद्रपूर संघाने जिंकून राज्य क्रिकेट स्पर्धेवर आपली मोहोर उमटवली. स्पर्धेचे उद्घाटन 30 डिसेंबर रोजी स. 9.00 वा. झाले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे ठाण्याचे आमदार मा संजय केळकर,नांजीभाई ठक्कर, एमसीएचे माजी जॉईंट सेक्रेटरी शहा आलम व रोटरी क्लबचे भावी DG डॉ. निलेश जयवंत व रोटरी क्लबच्या पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या स्पर्धेचा समारोप 31 डिसेंबर रोजी रोटरी क्लब च्या सर्वेसर्वा नेहा निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. तसेच या सामन्याचे प्रक्षेपण सहयाद्री व डीडी स्पोर्ट्स वरुन करण्यात आले.




विजेत्या संघाला 12000/- व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले तर उपविजेत्या संघाला 8000/- रुपये व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. मालिका वीराचा किताब गौरव झाडे या खेळाडूने पटकावला. सदर स्पर्धेत रोटरी क्लब ठाणे सेंट्रल यांचे सहकार्य मिळाले म्हणूनच या स्पर्धा यशस्वी होऊ शकल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीते करता सौ. माधवी डोळे, अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले.

10. **लुईस ब्रेल पुण्यस्मरण दिनाचे आयोजन:** अंधांचे दैवत स्वर्गीय लुईस ब्रेल यांचा 6 जानेवारी रोजी पुण्यस्मरण दिवस असतो. मात्र संस्थेच्या वतीने यावर्षी हा कार्यक्रम शनिवार दिनांक 11 जानेवारी 2025 रोजी काशीमळी मंगल कार्यालय द्वारका येथे आयोजित केला होता. खरे तर स्वर्गीय लुईस ब्रेल यांनी दृष्टीहीन व्यक्तींना ज्ञानाचा तिसरा डोळा देऊ केला. त्यामुळे आज अंध व्यक्ती वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळ्या पदांवर काम करतात कोणी व्यवसायिक देखील झाले आहे आणि लुईस बेल यांचा आदर्श नवीन पिढीला पण घेता यायला हवा या उद्देशाने संस्थेच्या वतीने ब्रेल लिपीचे संवर्धन व्हावे म्हणून कालनिर्णय या ब्रेल दिनदर्शिकेचे प्रकाशन देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आरंभी दीप प्रज्वलन करण्यात आले या कार्यक्रमाला मोतीवाल कॉलेजचे संस्थापक श्री. ए. एफ मोतीवाल नाशिक मधील उद्योजक जयंतीभाई लाहोटी व त्यांचा मित्रपरिवार व बँक ऑफ इंडियाचे सचिन जाधव उपस्थित होते.



आरंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले व अंधांमध्ये ज्या क्षमता असतात त्या जोपासाव्यात म्हणून विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम देखील यानिमित्ताने आयोजित करण्यात आला होता. नाशिक जिल्ह्यातून या कार्यक्रमाला अंदाजे 109 अंध बांधवांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वी ते करितासंस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर,संस्थेचे महासचिवदत्तात्रय पाटील, संचालक भगवान पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

11. **हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन**: संस्थेच्या वतीने रथसप्तमीचे औचित्य साधून शालिमार येथील संस्थेच्या कार्यालयात दिनांक 1 जानेवारी 2025 या तारखेला हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात 45 महिलांना तिळगुळासह वान देण्यात आले. खरे तर डोळस महिलांना एकत्रित येण्याच्या अनेक संधी असतात. परंतु आपल्या दृष्टीहीन भगिनींसाठी अशा संधी क्वचित येतात आणि म्हणूनच संस्थेच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलं ज्यामुळे विचारांची अदान-प्रदानही होऊ शकते. या कार्यक्रमास सौ. आशा वेणु गोपाल यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या कोषाध्यक्षा विजया डबे मराठे, रेचल शिरसाठ यांनी विशेष परिश्रम घेतले.



12. **राष्ट्रीय अंध क्रिकेट स्पर्धेचे आयोजन :**संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या अंधांच्या 16 व्या सियारामचषक राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन ब्रेबॉर्न स्टेडियमवर आज शानदार पद्धतीने करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उदघाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री मा.गिरीश महाजन,आमदार प्रसाद लाड, CCI च्या अध्यक्षा मधुमती लेले व सियाराम कंपनीचे सर्वोसर्वा रमेश पोद्दार यांच्या हस्ते झाले.

आरंभी बँड च्या तालावर सर्व खेळाडूंनी मान्यवरांना मानवंदना दिली.या वेळी मा.गिरिशजी महाजन यांनी आपण अंध असलात तरी आपल्यात आत्माविश्वास कमालीचा आहे व आत्मविश्वास असेल तर मनुष्य कोणतेही काम फत्ते करू शकतो असे प्रतिपादन उद्घाटन प्रसंगी केले. तसेच आपल्या संस्थेच्या त्रंबक रोडवरील अंधांच्या संस्थेच्या बांधकामास जातीने लक्ष घालू असे आश्वासन दिले. मैदानावर जाऊन चेंडू मारून मंत्री महोदयांनी या स्पर्धेचे उद्घाटन केले. तर संस्थेच्या उपक्रमांची माहिती व ही क्रिकेट स्पर्धा का घेतो याबद्दलची माहिती संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी मान्यवरांना दिली.

यावेळी संस्थेच्या मानद अध्यक्षा सौ. कल्पना पांडे, श्याम मखारीया, संस्थेचे डायरेक्टर अर्जुन मुद्दा इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सलामीचा सामना दिल्ली विरुद्ध महाराष्ट्र या संघांमध्ये झाला. रन रेट च्या आधारावर गुजरात आणि गोवा हे संघ अंतिम फेरीत पोहोचले. गुजरातने प्रथम फलंदाजी करून चार बाद 221 धावांचे लक्ष गोवा संघासमोर ठेवले. मात्र गोवा संघाला या लक्षाचा पिछा करता आला नाही. त्यांचा डाव 7 बाद 170 धाव संख्येवरच गुजरात संघाने रोखला. या स्पर्धेत विजेत्या संघाला रोख रक्कम व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले तर उपविजेत्या संघालाही रोख रक्कम व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत मालिकाविराचा मानकरी पूर्णतः अंध गटात मध्ये गोव्याच्या आफताब पटेल ह्यांना मिळाला, तर अंशतः अंधांमध्ये जिना केसरी ह्याने मालिकावीराचा किताब पटकावला.






या कार्यक्रमाला सियाराम कंपनीच्या वतीने श्री पवन पोतदार, उद्योजक आशिष काबरा व रोटरी क्लब बॉम्बे क्वीन सिटी चे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळेस संस्थेच्या वतीने हा उपक्रम का राबविला जातो. यामागची पार्श्वभूमी उपस्थितांना अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी सांगितले. तर संस्था पुढील वर्षी वीस वर्षे पूर्ण करत असल्याने एशिया कप स्पर्धा घेण्याचा देखील मानस त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता कोषाध्यक्ष विजया मराठे, संचालक अर्जुन मुद्दा, संचालक भगवान पवार व रेचल शिरसाठ यांनी विशेष परिश्रम घेतले.

13. **महिला दिना निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन:**संस्थेच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून 15 मार्च 2025 रोजी नाशिक येथील हुतात्मा स्मारक येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात नाशिक जिल्ह्यातून साधारण 90 महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळेस त्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याकरिता संस्थेच्या वतीने गीत गायन स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कुमारी गौतमी वाघ हिने गायन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक तर यमुना चौधरी हिने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. तर प्रश्नमंजुषा स्पर्धेत रोहिणी नागरे हिच्या गटाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तसेच सर्व महिलांना साड्या भेट म्हणून देण्यात आल्या. maheमहेश banबँकेचे sasसंsancसंचालक vvikaविकास salvसाळवे v sau. nirmala salve

अशाच पद्धतीचा कार्यक्रम मुंबई येथील बहाय सेंटर येथे देखील 22 मार्च 2025 रोजी आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने गुणवंत महिलांचा सत्कार,स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या दहा अंध महिलांना व्यवसाय करता मदत व काही स्पर्धांचे आयोजन केलं होतं. इनरव्हील क्लब मुंबई यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मिता रॉय अध्यक्ष इनरविल ग्रुप मुंबई  या उपस्थित होत्या. यावेळेस प्रियंका घुमरे, सिद्धी दळवी, प्रतीक्षा कदम, तेजस्विनी सासे, पायल तायडे या गुणवंत महिलांचा सत्कार करण्यात आला यावेळी या पाचही महिला अंध असून त्यांनी विशेष उल्लेखनीय काम केले आहे.



प्रियांका घुमरे बी.एम.सी मध्ये क्रीडा अधिकारी आहेत तर तेजल या लेक्चर पदाचा राजीनामा देऊन सध्या पीएचडी करत आहे. सिद्धी दळवी हिने डोळसांबरोबर कॉम्प्युटरवर 10 वी चे पेपर लिहिले व तिला 94 टक्के गुण मिळाले तर तेजस्वीनी सासे हिने गोल बॉल मध्ये नाविन्य मिळवले तर 9 अंध महिलांना स्वयंरोजगाराकरता मान्यवरांच्या हस्ते मदत करण्यात आली. आरंभी हा कार्यक्रम घेण्याचा उद्देश काय व संस्थेच्या उपक्रमांची माहिती संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी दिली व विशेष म्हणजे कार्यक्रम महिला दिनाचा असल्यामुळे संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालनापासून तर आभार प्रदर्शनापर्यंत सर्व कामे महिलांनीच केली हे या कार्यक्रमाचे एक आगळे वेगळे वैशिष्ट्य होते. कार्यक्रमाच्या यशस्वीते करता सुचिता पाटील, रेचल शिरसाठ, निवेदिता पाटील, सुनीता आव्हाड व संस्थेचे संचालक दिनेश मुसळे पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

अशा प्रकारे वर्षभरात एकूण 14 उपक्रम संस्थेमार्फत राबविण्यात आले. यामध्ये विविधता असून त्या त्या दृष्टीने त्यांच्या अडचणी किंवा गरजा लक्षात घेऊन उपक्रम राबविले या करिता समाजातील दानशूर व्यक्ति, संस्था, कॉर्पोरेट बँका, भारत पेट्रोलियम, LIC, रोटरी व लायन्स क्लब सारख्यासामाजिक संस्था यांचा मोलाचा सहभाग आहे. या व्यतिरिक्त सातत्याने मदत करणारे व संस्थेच्या सुरुवातीपासूनच जोडले गेलेले, संस्थेसाठी मोलाचे सहकार्य करणारे अहमदनगरचे श्री. नरेंद्र फिरोदिया, श्री. हिरामन आहेर, जैन इरिगेशन चे अशोकभाऊ जैन, श्री. प्रवीण पारेख, श्री. कृषणकुमार गोयल, दिपक शहा, नांजीभाई ठक्कर ठाणावाला, माजी पोलिस आयुक्त श्री. हरिष बैजल, पी आय श्री. किरण कबाडे, सियाराम मिल्स इ. दरवर्षी भरीव सहकार्य करतात. या सर्वांचा मी मनापासून आभारी आहे. हे कार्य अव्याहतपणे होत राहो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना, माझ्याकडून अनावधानाने कोना व्यक्तीचे अथवा संस्थेचे नाव या अहवालात राहून गेले असल्यास मनापासून नम्रपणे माफी मागतो.

सर्व ज्ञात अज्ञात समाज बांधवांचे मनापासून खूप खूप आभार.

सदैव राहू द्या आशीर्वादाची
थाप आमच्या पाठी,
काळजातले दोन शब्द
तुमच्या आभारासाठी !

महासचिव

दत्तात्रय शंकर पाटील